अधिदान व लेखा कार्यालय

महाराष्ट्र शासन

☎ ०२२-२६५६६३००/३३२
E-mail : pao_mumbai@yahoo.co.in

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

क्र.अले/आस्था/अ/ ३६१

दि. 12 DEC 2023

-: दरपत्रक सूचना :-

अधिदान व लेखा कार्यालयातील वांद्रे (पु) व चर्चगेट येथील अधिकारी / कर्मचारी वर्गाला दि. २९.०३.२०२४, ३०.०३.२०२४ व दि. ३१.०३.२०२४ रोजी खालीलप्रमाणे अल्पोपहार (नाश्ता, चहा/कॉफी) व रात्रीचे जेवण पुरविणेबाबत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

दिनांक	खाद्यपदार्थांचे प्रकार	पुरवठा करण्याची वेळ	पुरवठा करावयाचे नग
२९.०३.२०२४	बटाटा वडा / कटलेट / अननस शिरा **(यापैकी एक पदार्थ)** चहा = १ वेळा कॉफी =१ वेळा	सायंकाळी ४.०० वाजता	४०० प्लेट २०० कप चहा २०० कप कॉफी
३०.०३.२०२४	बटाटा वडा / कटलेट / अननस शिरा **(यापैकी एक पदार्थ)** चहा = १ वेळा कॉफी =१ वेळा	सायंकाळी ४.०० वाजता	४०० प्लेट २०० कप चहा २०० कप कॉफी
३१.०३.२०२४	बटाटा भजी/ मिक्स भजी व जिलेबी चहा = १ वेळा कॉफी =१ वेळा	सायंकाळी ४.०० वाजता	४०० प्लेट २०० कप चहा २०० कप कॉफी
३१.०३.२०२४ (रात्री)	**जेवण (शाकाहारी जेवण)** : जिरा राईस, डाळ तडका, पुरी / चपाती, काजू मसाला, पनीर मटर, तवा फ्राय व्हेजिटेबल, कटलेट, पुरी, भजी, कोशिंबीर, लोणचे, पापड, चटणी, गोड पदार्थ (रबडी / सिताफळ बासुंदी)	रात्री ८.०० वाजता	४०० थाळी

दरपत्रकासंबंधी अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

1. पुरवठाधारकांनी अन्न, औषध प्रशासन यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक.
2. पुरवठाधारकांनी वस्तु व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक.
3. पुरवठाधारकांनी त्यांच्या/संस्थेच्या PAN card ची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक.
4. उपरोक्त नमूद खाद्यपदार्थ सुस्थितीत, ताजे तसेच कर्मचाऱ्यांना नाश्ता, चहा/कॉफी त्यांच्या बैठकीच्या जागेवरच पुरविण्याची जबाबदारी पुरवठा धारकांची राहील.
5. वरील नमुद संख्येत कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच उपरोक्त दिनांका व्यतिरिक्त इतर दिवशी कार्यालय चालु राहण्याची शक्यता गृहित धरुन नाश्ता, चहा/कॉफी पुरविण्याबाबत कळविण्यात आल्यास दरपत्रकातील नमुद दरानेच पुरवठा करावा लागेल.
6. उपरोक्त दिनांकामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
7. उपरोक्त दरपत्रके स्विकारण्याचे व नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे कडे राहतील.

तरी आपली दरपत्रके अधिदान व लेखा कार्यालय (आस्थापना शाखा), दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ येथे दिनांक १३.१२.२०२३ ते दिनांक २१.१२.२०२३ या कालावधीत संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यात सादर करावीत. तसेच दरपत्रके दिनांक २२.१२.२०२३ रोजी संध्या. ४.०० वाजता उपरोक्त नमूद ठिकाणी उपस्थित असलेल्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

अधिदान व लेखा अधिकारी

प्रति,

1. स्वप्नील कॅटरर्स
2. वर्दे कॅटरर्स
3. सिध्दीविनायक कॅटरर्स
4. ओम साईराम कॅटरर्स
5. श्री गणेश कॅटरर्स आणि ईव्हेंट ऑर्गनायझर्स
6. श्री व्यंकटा साई कॅटरर्स